# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.१७/०८/२०२२

**<u>प्रेसनोट</u>**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त महाराष्ट्र शासन पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या शासन पत्रकान्वये राज्यात “स्वराज्य महोत्सव” कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. “स्वराज्य महोत्सव” अंतर्गत संपूर्ण राज्यात त्याचबरोबर वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातही आज दि.१७ ऑगस्ट, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता “समूह राष्ट्रगीत गायन” हा उपक्रम राबविण्यात आला. वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालय त्याचप्रमाणे सर्व प्रभाग समिती कार्यालये व संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी “समूह राष्ट्रगीत गायन” करण्यात आले.

महानगरपालिका मुख्यालयात मा.महासभा सभागृहात मा.आयुक्त तथा प्रशासक श्री.अनिलकुमार पवार यांच्या उपस्थितीत “समूह राष्ट्रगीत गायन” करण्यात आले. यावेळी महानगरपालिका मुख्यालयातील अधिकारी व सर्व कर्मचारी उपस्थित होते. महानगरपालिका सर्व प्रभाग समिती कार्यालये, मनपा रुग्णालये, ना.प्रा.आ.केंद्रे, विविध कार्यालये इ.मध्ये अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत “समूह राष्ट्रगीत गायन” करण्यात आले. त्याचप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शाळा, महाविद्यालये, शिक्षण संस्था, विविध संस्था, निवासी संस्था इ. ठिकाणीही “समूह राष्ट्रगीत गायन” करण्यात आले.

**मुख्य कार्यालय विरार**
**वसई विरार शहर महानगरपालिका**